मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# श्री क्षेत्र अलंकापुरीत वैष्णव दाखल!

## इंद्रायणीकाठी स्नानासाठी गर्दी : वडिवळे आणि आंद्रा धरणातून पाणी सोडून इंद्रायणी नदी स्वच्छ

**पिंपरी | प्रतिनिधी**

आषाढी वारीकरिता श्री क्षेत्र अलंकापुरीत वैष्णव दाखल झाले आहेत. राज्य-परराज्यातील वैष्णवजनांनी इंद्रायणी नदीकाठी पवित्र स्नानाकरिता गुरुवारी सकाळी मोठी गर्दी केली होती. अलंकापुरीतील मठ, धर्मशाळा व राहुट्यामधून हे वैष्णव हरिनामाचा गजर करत आहेत. वडिवळे आणि आंद्रा धरणातून पाणी सोडून नदी स्वच्छ करण्यात आली आहे.

आषाढी वारीसाठी आळंदी येथून श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी शनिवारी पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी वारकरी, भाविक आणि दिंड्या आळंदीत दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचे पालखी प्रस्थान शनिवारी देऊळवाड्यातून होणार आहे. मंदिरातून प्रस्थान आणि पहिल्या मुक्कामातील पाहूणचार घेतल्यानंतर ३० जून रोजी श्रींचा पालखी सोहळा पुणे मार्गे पंढरीला जाण्यास मार्गस्थ होतो.



आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या तोंडावर आळंदी येथील इंद्रायणी नदीतील पाण्यावर जलप्रदूषण, रसायनमिश्रित पाण्यामुळे पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात तवंग (फेस) आला होता. वारकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे प्रशासन सतर्क झाले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नगरपरिषदेने विविध उपाययोजना हाती घेतल्या. पाटबंधारे विभागाला विनंती करून इंद्रायणी नदीत पाणी सोडण्यास सांगितले. पाण्याच्या प्रवाहामुळे नदीतील तवंग वाहून गेला. नदी स्वच्छ दिसत असल्याने वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे म्हणाले की, वडिवळे आणि आंद्रा धरणातून १९ जून रोजी शंभर क्यूसेक वेगाने इंद्रायणी नदीत पाणी सोडले होते. हे पाणी मंगळवारी आळंदीतील पात्रापर्यंत आले. पाण्याच्या प्रवाहामुळे नदीतील तवंग वाहून गेला आहे. नदी स्वच्छ आणि सुंदर झाली आहे.

### चोरी, गैरप्रकार रोखण्यासाठी गुन्हे शाखेचा बंदोबस्त

पालखी सोहळ्यातील गर्दीत चोरट्यांकडून भाविकांकडील ऐवजाची चोरी केली जाते. त्यामुळे सोनसाखळी, मोबाइल चोरी रोखण्यासाठी गुन्हे शाखेतील पोलिसांची पथके साध्या वेशात गस्त घालणार आहेत.

### पालखी सोहळा बंदोबस्त

- अतिरिक्त पोलीस आयुक्त – २
- पोलीस उपायुक्त – १०
- सहायक पोलीस आयुक्त – २०
- पोलीस निरीक्षक – १०१
- सहायक निरीक्षक, उपनिरीक्षक – ३४३
- पोलीस कर्मचारी – ३ हजार ६९३
- गृहरक्ष दलाचे जवान- ८००
- राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्या

### सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची सोहळ्यावर नजर

» पालखी सोहळ्यावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. पालखी सोहळ्यातील गर्दीचे नियोजन करण्याची जबाबदारी पोलिसांवर आहे. त्यासाठी शहरात पाच हजार पोलीस कर्मचारी बंदोबस्तास तैनात राहणार आहेत. गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी चौकाचौकात निरीक्षण मनोरे उभे करण्यात येणार आहेत. वाहतूक नियोजनासाठी स्वतंत्र पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# वरंधा घाट रस्ता पावसाळा कालावधीत पूर्णपणे बंद

## वरंधा घाट रस्ता 26 जून ते 31 ऑगस्ट 2024 पर्यंत अवजड वाहतुकीकरीता संपूर्णपणे बंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोर- महाड वरंधा घाट प्रमुख राज्य महामार्ग क्र.१५ (नवीन अधिसूचित पंढरपूर- भोर- महाड राष्ट्रीय महामार्ग क्र. ९६५ डीडी) वरील भोर तालुक्याच्या हद्दीतील वरंधा घाट रस्ता पावसाळा कालावधीत २६ जून ते ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत अवजड वाहतुकीकरीता संपूर्णपणे बंद करण्याबाबतची अधिसूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. सुहास दिवसे यांनी जारी केली आहे.



या घाटातील पुणे जिल्ह्याच्या हद्दीतील रस्ता हा नागमोडी वळणाचा असून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन अनेकवेळा अचानक दरडी कोसळणे, झाडे पडणे, रस्ता खचणे, माती वाहून जाणे अशा स्वरुपाच्या घटना घडतात. त्यामुळे संभाव्य जीवित व वित्त हानी टाळण्याच्या उद्देशाने हा घाट रस्ता पावसाळा कालावधीत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्ह्यात भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या नारंगी आणि लाल इशाऱ्याच्या वेळी सर्व प्रकारच्या अवजड, मध्यम व हलक्या प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीकरीता रस्ता बंद राहील. नारंगी आणि लाल इशारा नसलेल्या कालावधीत सदर घाट रस्ता फक्त हलक्या वाहनांच्या वाहतुकीसाठी खुला राहील, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# गणेशोत्सवात मेट्रोची स्वारगेटपर्यंत धाव

## जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या भुयारी मेट्रो मार्गाचे काम 95 टक्के पूर्ण : जुलैअखेरीस ते पूर्ण होणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे मेट्रोची स्वारगेटपर्यंत सेवा गणेशोत्सवाच्या आधी सुरू होण्याची शक्यता आहे. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या भुयारी मेट्रो मार्गाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले असून, जुलैअखेरीस ते पूर्ण होणार आहे. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या आधी या मार्गावर मेट्रो सेवा सुरू करण्याचे महामेट्रोने नियोजन केले आहे.



जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मार्गावर बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट अशी तीन स्थानके असून, हा मार्ग ३.६४ किलोमीटरचा आहे. या भुयारी मार्गावर मेट्रोची चाचणी फेब्रुवारीमध्ये घेण्यात आली. यातील जिल्हा न्यायालय स्थानक ते बुधवार पेठ स्थानक मार्ग मुठा नदीपात्राच्या खालून जातो. त्यामुळे शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा प्रकारे नदीपात्राखालून मेट्रो धावणार आहे. या मार्गाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. मार्गाचे काम जुलैअखेरीस पूर्ण करण्याचे महामेट्रोचे नियोजन आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

मेट्रो मार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांना तपासणीसाठी बोलाविण्यात येणार आहे. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त या मार्गाची तपासणी करून त्याला अंतिम मंजुरी देतील. ही मंजुरी मिळाल्यानंतर मेट्रोकडून राज्य सरकारकडे या मार्गावर सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव पाठविला जाणार आहे. त्यामुळे सप्टेंबर महिन्यात या मार्गावर सेवा सुरू होण्याची शक्यता आहे. कारण सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. आचारसंहिता लागू झाल्यास ही सेवा सुरू होणे लांबणीवर पडू शकते, असे सूत्रांनी सांगितले.

**पुणेकर घेणार भुयारी मार्गाचा आनंद**

शिवाजीनगर सिव्हिल कोर्ट ते स्वारगेटदरम्यान तीन स्थानके असणार आहेत. यामध्ये बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट अशी स्थानके असणार आहेत. हा मेट्रो मार्ग मुठा नदीच्या शंभर मीटर खालून जात आहे. यासह या मार्गावरील कोणत्याच इमारतीच्या किंवा घरांच्या पायाला धक्का न लागता मेट्रो मार्ग तयार करण्यात आला आहे. त्यामुळे पुणेकर प्रवासादरम्यान या भुयारी मार्गाचा आनंद घेणार आहेत.

**सायकलप्रेमींना सायकलसह मेट्रोमधून प्रवास करता येणार**

वनाज ते रामवाडी आणि पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट अशा दोन मार्गावर मेट्रो धावणार असल्यामुळे सायकलप्रेमींना आपल्या सायकलसह मेट्रोतून प्रवास करता येणार आहे. सायकलस्वार जवळच्या मेट्रो स्थानकावर सायकलने येतील. त्यानंतर लिफ्टने मेट्रोच्या प्लॅटफॉर्मवरून ते सायकलसह मेट्रो मधून प्रवास करून निश्चित थांब्यांवर जातील. त्यामुळे विद्यार्थी, नोकरदार, आयटी प्रोफेशनल्स यांना फायदा होऊ शकतो.

**मध्यवर्ती भागात भाविकांची सोय**

» शहरातील मध्यवर्ती पेठांच्या भागात मानाचे गणपती आहेत. या गणपतींच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने येतात. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मार्गावर मेट्रो सेवा सुरू झाल्यास भाविकांची मोठी सोय होणार आहे. मध्यवर्ती भागात गर्दीमुळे भाविकांना वाहनाने जाणे शक्य होत नाही. अशा ठिकाणी भाविक मेट्रोच्या सहाय्याने जाऊ शकणार आहेत.

> जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो मार्गाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे. हे काम जुलैच्या अखेरपर्यंत पूर्ण होईल. या मार्गावरील सेवा गणेशोत्सवाच्या आधी सुरू करण्याचे आमचे प्रयत्न आहेत.
> **- अतुल गाडगीळ, संचालक, महामेट्रो.**

# पुण्यातील तस्कराकडून पार्टीत मेफेड्रोनचा पुरवठा

## पुणे कामातून गेले : प्रतिमा बदलण्यासाठी मंत्री चंद्रकांत पाटील यांची सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

गोखले (फर्ग्युसन) रस्त्यावरील एल थ्री बारमधील पार्टीत सहभागी झालेल्या तरुणांना पुण्यातील अमली पदार्थ तस्कराने मेफेड्रोनचा पुरवठा केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. या तस्कराचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे. या गुन्ह्यात पोलिसांनी अमली पदार्थविरोधी कायद्यान्वये (एनडीपीएस) कलमवाढ केली असल्याची माहिती परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी दिली.



एल थ्री बारमधील पार्टीत तरुण अमली पदार्थाचे सेवन करत असल्याची चित्रफीत प्रसारित झाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने याप्रकरणी कारवाई करून बारच्या जागामालकासह आठ जणांना अटक केली. पार्टीत मेफेड्रोनचे सेवन करणारे नितीन ठोंबरे आणि करण मिश्रा यांनाही अटक करण्यात आली. आतापर्यंत दहाजणांना अटक करण्यात आली आहे. आरोपी ठोंबरे आणि मिश्रा यांनी पुण्यातून मेफेड्रोन खरेदी केल्याची माहिती तपासात मिळाली आहे. त्यांना मेफेड्रोनची विक्री करणाऱ्या तस्कराचा शोध सुरू असल्याचे पोलीस उपायुक्त गिल यांनी सांगितले.

एल थ्री बारमधील पार्टीत सहभागी झालेल्या नऊ तरुणांचा पोलिसांनी शोध घेतला असून, त्यांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा समांतर तपास करण्यात येत आहे.

**हॉटेलमधील सहा कर्मचाऱ्यांना अटक**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकानेही रविवारी सायंकाळी एल थ्री बारमध्ये छापा टाकून सव्वातीन लाख रुपयांचा बेकायदा मद्यसाठा जप्त केला. याप्रकरणी उत्पादन शुल्क विभागाने सहा कर्मचाऱ्यांना (वेटर) अटक केली. कर्तव्यात कसुरी केल्याप्रकरणी उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक अनंत पाटील आणि विठ्ठल बोबडे यांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पुणे कार्यालयाचे अधीक्षक चरणसिंह रजपूत यांनी दिली.

**रात्रोत्तर पार्ट्यांची समाज माध्यमांत जाहिरात**

» कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर पबचालकांनी रात्री साडेबारापूर्वी पब बंद करावेत, असे आदेश पोलिसांनी दिले. त्यानंतरही काहीजण 'लेटनाइट पार्टी' आयोजित करत असल्याचे उघडकीस आले आहे. समाज माध्यमांचा वापर करून अशा प्रकारच्या पार्ट्यांची जाहिरात केली जाते. कल्ट पबमध्ये शनिवारी रात्री एक पार्टी झाली. त्यातच कामठेने ध्वनिवर्धकावरून एल थ्री बारमधील लेटनाइट पार्टीची घोषणा केली होती. तेथून एल थ्री बारमध्ये आलेल्या तरुणांसाठी समाज माध्यमात 'पुणे व्हाइब्ज' नावाने समूह तयार करण्यात आला होता. या रात्रोत्तर पार्टीसाठी ऑनलाइन आणि रोख स्वरूपात पैसे घेतले गेले होते.

# वायसीएममध्ये नर्सिंगसह पॅरामेडिकल कोर्सेसला तत्त्वत: मान्यता

## कोर्सेस सुरू करण्यासाठी राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने तत्त्वत: मंजुरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात बीएससी नर्सिंग महाविद्यालय आणि पॅरामेडिकल कोर्सेस सुरू करण्यासाठी राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने तत्वत: मंजुरी दिली. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयामध्ये रुग्णसेवेकरिता कार्यरत नर्सिंग आणि इतर विभागाच्या कामकाजामध्ये मदत होणार आहे.




महापालिका हद्दीतील आणि बाहेरील विद्यार्थ्यांना अल्प दरात नर्सिंग शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच या नर्सिंग महाविद्यालयासाठी विविध संवर्गातील २४ पदांची निर्मितीही करण्यात येणार आहे. शहरातील वैद्यकीय सुविधा आणखी बळकट करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्याचा महापालिकेचा मानस होता. याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता.

या प्रस्तावास शासनाची मंजुरी मिळाली असून रुग्णालयाच्या आवारात ११ मजली नवीन इमारतीच्या तिसऱ्या, चौथ्या व सहाव्या मजल्यावर नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यात येणार आहे. बी.एस.सी. नर्सिंगकरिता ६० विद्यार्थी भरती प्रस्तावित आहे. हा अभ्यासक्रम चार वर्षाचा असल्याने चारही वर्षाचे मिळून एकत्रित २४० विद्यार्थी सेवेमध्ये हातभार लावतील. तसेच इतर पॅरावैद्यकीय कोर्सेस (बीपीएमटी, पीजीडीएमएलटी) पूर्ण क्षमतेने सुरू झालेस ३०० ते ४०० प्रशिक्षणार्थी विविध विभागाच्या कामकाजाकरिता उपलब्ध होणार आहे.

> यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात बीएससी नर्सिंग कॉलेज व पॅरामेडिकल कोर्सेस सुरू झाल्यानंतर वायसीएम रुग्णालयामध्ये सुश्रुषा विभाग व इतर विभागाचे कामकाजात मदत प्राप्त होणार आहे. पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण रुग्णालयाशी संलग्नित बीएससी नर्सिंग कॉलेज व पॅरामेडिकल कोर्सेस वायसीएम रुग्णालयात सुरू करून पालिकेमार्फत दिली जाणारी रुग्णसेवा अधिक सक्षम करण्यात हातभार लागणार आहे.
> - **डॉ. राजेंद्र वाबळे, अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय.**

> बीएससी नर्सिंग महाविद्यालय तसेच पॅरामेडिकल कोर्सेस सुरू झाल्यानंतर गरजू विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच अल्प दरात शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. भविष्यातही शहरातील वैद्यकीय सुविधा अधिक बळकट करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना राबवण्यात येणार असून शहरवासियांना उत्तम वैद्यकीय सुविधा पुरवण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.
> - **डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका.**

# शहरात दीड हजार घरांमध्ये डेंग्यूच्या अळ्या

## प्रतिबंधात्मक कारवाईत 72 हजार रुपयांचा दंड केला वसूल : 585 आस्थापनांना बजावली नोटीस

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाल्याने आरोग्य विभागाकडून शहरातील प्रत्येक घरे, विविध आस्थापना, बांधकाम साईट, भंगार दुकाने यासह विविध ठिकाणी डासांच्या अळ्यांची तपासणी करण्यात येत आहे. या कंटेनर सर्व्हे एकूण १ लाख १ हजार १९५ घरे, २८० बांधकाम साईटची तपासणी करण्यात आली. यामध्ये १४५० घरांमध्ये डासांच्या अळ्या आढळल्या. तसेच ५८५ विविध आस्थापनांना नोटीस बजावण्यात आली आहे. या कारवाईमध्ये एकूण ७२ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कीटकनाशक आणि औष्णिक धुरीकरण विभागाच्या वतीने १ ते २२ जून २०२४ या कालावधीत केलेल्या तपासणीत शहरातील विविध ठिकाणी डासांच्या अळ्या आढळून आल्याने १४ जणांवर 'डास उत्पत्ती स्थानांची निर्मिती' या शीर्षकाखाली दंड प्रमाणांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. महापालिकेच्या आरोग्य तपासणी पथकाच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी पाहणी करून एकूण १ लाख १ हजार १९५ घरे तसेच २८० बांधकामांची तपासणी करण्यात आली. यामध्ये एकूण १ हजार ४५० घरांमध्ये डासांच्या अळ्या आढळल्या. तसेच या पाहणीदरम्यान २८२ टायर, पंक्चर भंगारांची दुकाने, ४ लाख ७४ हजार ४० कंटेनर्सचीही तपासणी करण्यात आली. त्यामध्ये १ हजार ४५४ कंटेनर्समध्ये डासांच्या अळ्या आढळल्या होत्या. या ठिकाणी योग्य ती डास प्रतिबंधात्मक उपाययोजना करून संबंधितांना नोटीस बजावण्यात आली आहे.

पावसाळ्यात हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्या सारखे रोग पसरू नयेत म्हणून महापालिकेकडून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे. शहरातील डेंग्यू, मलेरिया प्रतिबंधात्मक मोहिमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शहरात डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तपासणी पथकातील कर्मचारी तपासणीसाठी आल्यास त्यांना नागरिकांनी सहकार्य करावे. तसेच महापालिकेच्या रुग्णालयात तसेच दवाखान्यांमध्ये डेंग्यूच्या तपासणीकरिता आवश्यक असलेले रॅपिड किट उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. कीटकजन्य रोग नियंत्रणासाठी स्वच्छ पाण्यात गप्पी मासे सोडणे, शहरातील विविध ठिकाणी पाहणी करून घरांच्या कंटेनरचे सर्वेक्षण, व्यवसायाच्या ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यासाठी तपासणी पथकांची नेमणूक करून डासांच्या अळ्या आढळून आलेल्या ठिकाणी कारवाई करण्यात येत आहे.

### घरातील साधनांची तपासणी आवश्यक

» **घराच्या आत आणि बाहेर स्वच्छ पाण्याने भरलेल्या कंटेनरमध्ये डासांची उत्पत्ती होत असते, शिवाय घरातील फ्लॉवर-पॉट, मनी प्लांट्स आणि फ्रीज ड्रिप पॅनमधील पाण्यात देखील अशी उत्पत्ती आढळून येते यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून अशा साधनांची नागरिकांनी नियमितपणे तपासणी करणे देखील आवश्यक आहे.**

> औद्योगिक, बांधकाम आस्थापना, कार्यालये, गृहसंस्था, घरे तसेच व्यावसायिक दुकानांसह सर्व आस्थापनांनी आपल्या ठिकाणी असलेली डासोत्पत्ती स्थळे तत्काळ नष्ट करावीत अन्यथा कठोर कारवाई केली जाईल. तसेच शहरात सुरू असलेल्या विविध बांधकामांच्या ठिकाणी महापालिकेने विशेष लक्ष केंद्रित केले असून त्या भागांची तपासणी करून संबंधितांना नोटीस बजावण्यात येत आहे. शिवाय अशी ठिकाणे आढळून आलेल्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.
> - **विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, महापालिका.**

# बाणेरमधील 'एस्को बार' जमीनदोस्त

## अनधिकृत पब, बार, रेस्टॉरंटवर पुणे महापालिकेचे कारवाईचे सत्र सुरूच : शहरातील 19 ठिकाणी केली धडक कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

पोर्शे कार अपघात प्रकरणानंतर एफसी रस्त्यावरील 'लिक्विड लिझर लाउंज' (एल थ्री) बारमध्ये ड्रग्ज पार्टी झाल्याचे समोर आल्याने पुण्यात खळबळ उडाली आहे. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदेश दिल्यानंतर महापालिकेने पोलिसांच्या मदतीने एफसी रस्त्यासह शहरातील तब्बल २६ ठिकाणांवरील पब, बार, रेस्टॉरंटवर धडक कारवाई केली. हे कारवाईचे सत्र पुढे सुरू ठेवत बुधवारी (दि. २६) शहरातील १९ आस्थापनांचे बेकायदा ५६,०६१ चौरस फूट इतके बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले. यामध्ये बाणेर भागातील एस्को बारच्या आठ हजार चौरस फूट बेकायदा बांधकामाचाही समावेश आहे.



शहरात अनेक ठिकाणी पब, बार सुरू झाल्याने रात्री उशिरापर्यंत पार्ट्या रंगत आहेत. या पार्ट्यांमध्ये आता ड्रग्जचे सेवन केले जात असल्याचे व्हीडीओ व्हायरल झाल्याने पुण्यात खळबळ उडाली आहे. सुसंस्कृत पुण्यात अशा पार्ट्या रंगत असल्याने पुणेकरांकडून प्रशासनावर संताप व्यक्त केला जात आहे. शहरात काही घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येते. त्यानंतर कारवाईचे सत्र सुरू होते. मात्र इतर वेळी प्रशासनाने जाणूनबूजून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

पुण्यात सुरू झालेल्या पब, बार संस्कृतीमुळे अल्पवयीन मुले अमली पदार्थांना बळी पडत आहेत. त्यामुळे तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जाऊ लागली आहे. यामुळे राजकारण तापलेले असल्याने मुख्यमंत्री शिंदे यांनी महापालिका आणि पुणे पोलिसांना शहरातील अनधिकृत पब, बारवर धडक कारवाईचे आदेश दिले आहेत. पोलिसांचा बंदोबस्त उपलब्ध झाल्याने महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून धडक कारवाई केली जात असून बेकायदा बांधकाम जमीनदोस्त केले जात आहे. तसेच त्यानंतर संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करावा, यासाठी तक्रार अर्ज दाखल केला जात आहे. त्यानुसार मंगळवारी (दि. २५) 'एल थ्री' या बारवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महापालिकेच्या बांधकाम विभागाने मंगळवारी ३६,८४५ चौरस. फूट इतके बेकायदा बांधकाम पाडले. तर बुधवारी ५६,०६१ चौरस फूट असे एकूण ९२,९०६ चौरस फूट इतके बेकायदा बांधकाम पाडण्याची जोरदार कारवाई केली. अनधिकृत बांधकाम पाडण्याची कारवाई सुरूच राहणार असल्याचे महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### महापालिकेने या ठिकाणी केली कारवाई...

» बाणेर, द कार्नर लांऊज बार ३००० चौरस फूट, बाणेर, एमएल सिटोबार १२००० चौ. फूट, बाणेर, एस्को बार ८००० चौ. फूट, बाणेर, इलीफट बार १००० चौ. फूट, बाणेर, ब्रीव्ह मार्चट कॅफे १५०० चौ. फूट, बाणेर, उरबो किचन बार ३००० चौ. फूट, बाणेर, नेटीव बार २००० चौ. फूट, बाणेर, द ज्यॉईस बॉय ८०० चौ. फूट, बाणेर, फिलेमिट बार ३२०० चौ. फूट, बाणेर, थ्री मिस्टेकटर्स ६०० चौ. फूट, बाणेर, मनाली बार १२०० चौ. फूट, बालेवाडी, डॉक यार्ड २४०० चौ. फूट, कोरेगाव पार्क, रोडमामस साऊथ मेन रोड २००० चौ. फूट, कोरेगाव पार्क, दावा शाब व इतर २२३ चौ. फूट, कोरेगाव पार्क, निरंजन कवडे ७७55 चौ. फूट, कोरेगाव पार्क, प्रिम रेस्टोरेन्ट ८४०० चौ. फूट, कोरेगाव पार्क, टल्ली बार ६८८ चौ. फूट, शिवाजीनगर, सोशल हॉटेल एफसी रोड ४२७५ चौ. फूट, हडपसर सासवड रोड, १००० चौ. फूट.

# 'पार्किंग बे'वरील एअर इंडियाचे अपघातग्रस्त विमान हटविले

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रयत्नांना यश : संरक्षण मंत्र्यांच्या भेटीनंतर 24 तासांच्या आत कार्यवाही

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या दीड महिन्यांपासून पुणे विमानतळाच्या 'पार्किंग बे'वर उभ्या असणाऱ्या एअर इंडियाच्या अपघातग्रस्त विमानाला संरक्षण दलाच्या जागेत हलवण्यात आले आहे. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतल्यानंतर अवघ्या २४ तासात सदरील विमान संरक्षण खात्याच्या जागेत 'पार्क' करण्याची परवानगी दिली. या विमानाला हलविल्यामुळे पुणे विमानतळावरील ये-जा करणाऱ्या विमानांचा विलंब टळणार आहे.




पुणे विमानतळाच्या 'बे'वर एअर इंडियाचे अपघातग्रस्त विमान जागेवर उभे असल्याने त्याचा ताण इतर विमानांच्या प्रवासी वाहतुकीवर झाला होता. शिवाय ही बे वापरात नसल्यामुळे विमानांचे वेळापत्रक कोलमडत होते. सदरील विमान दुरुस्तीसाठी आणखी काही काळ लागण्याची शक्यता असल्याने विमान तात्पुरत्या स्वरुपात संरक्षण दलाच्या जागेवर हलविण्याचा पर्याय उपलब्ध होता. या पार्श्वभूमीवर अपघातग्रस्त विमान संरक्षण दलाच्या जागेत लावण्याबाबत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्याशी केंद्रीय मंत्री मोहोळ यांची चर्चा झाली होती.

केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले, 'अपघातग्रस्त विमान हटवल्याने याचा मोठा दिलासा पुणेकरांना मिळणार असून कोलमडलेले वेळापत्रक पुन्हा जागेवर येईल. १० पैकी १ बे बंद असल्याचा मोठा परिमाण झाला होता. एका दिवसाला एका पार्किंग बेवर ८ ते ९ विमानांची ये-जा होत असते. मात्र बे बंद असल्याने याचा अतिरिक्त ताण इतर ९ बेवर आला होता आणि याचमुळे वेळापत्रक कोलमडले होते.

'आम्ही अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष पार्किंग बेवर पाहणी केल्यानंतर संरक्षण खात्याच्या जागेत सदरील विमान पार्क करण्याचा पर्याय समोर आला. म्हणूनच तातडीने संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना पत्र पाठविले आणि भेटही घेतली. भेटीच्या २४ तासाच्या आतच ही कार्यवाही झाल्याने पुणेकर प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. तातडीने निर्णय घेतल्याबद्दल संरक्षण सिंह यांचे पुणेकरांच्या वतीने धन्यवाद मानतो', असेही मोहोळ म्हणाले.